जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा /२०१८/ 7786
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 27-०९ / २०१८

**प्रति,**

संस्थाचालक/प्राचार्य,
सर्व शासनमान्य वाणिज्य टंकलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य व गोवा.

**विषय :-** शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC) जानेवारी - २०१९ परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन (Online) नोंदणी व शुल्कासह आवेदनपत्र भरणेबाबत.(मॅन्युअल टायपिंग व लघुलेखन परीक्षा)

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, जीसीसी परीक्षा जून २०१८ ते डिसेंबर २०१८ या सत्रासाठी व जानेवारी २०१९ च्या परीक्षेस टंकलेखन व लघुलेखन अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन (Online) नोंदणी व शुल्कासह आवेदनपत्र भरणेसाठी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दिनांक२८/०९/२०१८ ते दिनांक २०/१०/२०१८ या कालावधीत लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उपरोक्त सत्रासाठी ज्या विद्यार्थ्यांनी ज्या विषयासाठी प्रवेश घेतला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची प्रथम नोंदणी करावी. नोंदणीची प्रिंट आऊट काढावी. सदर प्रिंट आऊटवर विद्यार्थ्याची स्वाक्षरी घ्यावी. नंतर विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क जमा करुन घेऊन त्यांचे आवेदनपत्र आवश्यकतेनुसार पूर्वअटींच्या पुराव्यानुसार अपलोड करावे. सदर परीक्षेचे आवेदनपत्र अपलोड करताना विद्यार्थ्याचे फोटो अपलोड करावा.

ज्या विद्यार्थ्यांची ८०% उपस्थिती पूर्ण होणार नाही अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र निर्गमित करण्यात येणार नाही. प्रवेशपत्र निर्गमित झाल्यानंतर कोणत्याही प्रकारे (नाव, विषय, फोटो, बॅच बदल) ऑनलाईन पद्धतीने केली जाणार नाही.

आवश्यकता भास ल्यास सबळ पुराव्यासह (विद्यार्थ्यांचे फोटोओळखपत्र उदा : निवडणूक ओळखपत्र, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, बँकेचे पासबुक इ. ) तपासून परीक्षा परिषदेच्या स्तरावरुन आयुक्तांच्या स्वाक्षरीने बदल करुन दिला जाईल.

सर्व संस्थाचालकांनी परीक्षार्थीची ऑनलाईन नोंदणी व शुल्कासह आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांचा आधार कार्ड क्रमांक नोंदवावा आणि प्रती विद्यार्थी / प्रती विषय रु. २००/- परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Payment Get-way द्वारेच परीक्षा शुल्क भरावे.. तसेच Payment Get-way पर्याया व्यतिरिक्त परिषदेच्या बँक खात्यावर NEFT / RTGS पध्दतीने परीक्षा शुल्क भरु नये. भरल्यास ते ग्राहय धरले जाणार नाही.

(तुकाराम सुपे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

**प्रत :-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प. सर्व
३. शिक्षण निरीक्षक, मुंबई (उ/द/प)